संपादक : बबन कांबळे

• वर्ष : ६ वे • अंक ७२ • रविवार दि. १४ जून २००९ • पृष्ठ ६ • RNI (MAHMAR/2003/11730)

# फुले-आंबेडकरांची परंपरा महाराष्ट्राला आहे-डॉ. जाधव



**पुणे, दि. १३ (नाना गायकवाड)-पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांची केंद्रीय नियोजन मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा आज शनिवारी पुणे विद्यापीठात सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. सत्काराला उत्तर देताना डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले की, मी दिल्लीत गेलो तरी माझे लक्ष घारीसारखे पुणे विद्यापीठावर राहिल. महाराष्ट्राला मी झुकते माप देण्याचा प्रयत्न करीन. कारण या महाराष्ट्राला क्रांतीसूर्य महात्मा फुले व प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची परंपरा आहे तर कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वारसा लाभलेला आहे.**

पुणे विद्यापीठाच्या 'आयुका' विभागाच्या हॉलमध्ये हा सत्कार समारंभ आयोजित केला होता. समारंभाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे ॲड. रावसाहेब शिंदे हे होते. प्रभारी कुलगुरु डॉ. अरुण अडसुळे, शिक्षक-शिक्षके तर संघटनेचे मदने, विद्यापीठाचे कुलसचिव माणिकराव जाधव, बीसीडीचे संचालक पंडित विद्यासागर गवई, प्राचार्य कानवडे, सहाय्यक कुलसचिव प्रा. विकास पाटील आदींनी आपल्या भाषणात डॉ. नरेंद्र जाधव यांना शुभेच्छा देऊन गुणगौरव केला.

डॉ. नरेंद्र जाधव आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, २००६ मध्ये अफगाणिस्तानच्या राष्ट्र उभारणीसाठी त्यांच्या अर्थव्यवस्थेत जीव आणण्याचे काम मी करीत होतो. त्यावेळीं मला. अचानक माझ्या पत्नीचा फोन आला, ती फोनवर म्हणाली की, तुम्ही कुलगुरुपद स्वीकाराल काय? मी म्हणालो, कोणत्या विद्यापीठाचे?, तेव्हा ती म्हणाली, पुणे विद्यापीठाचे. मी ताबडतोब म्हणालो की, होय! कारण ज्या पुणे शहरात आमच्या पिढ्यांना प्रवेश नव्हता, कुत्र्या-माजरांसारखे हीन दर्जाचे जिणे जगावे लागत होते. त्या पुणे शहरातल्या पुणे विद्यापीठाचा कुलगुरु होण्याचा मान मला मिळाला.

ज्यावेळी मी पुणे विद्यापीठाचा कुलगुरु होण्यासाठी होकार कळविला तेव्हा अनेकांना आश्चर्य वाटले. कित्येक जण मला वेडा झाला की काय? असे म्हणाले. कारण, वर्षाकाठी मला अफगाणिस्तानमध्ये सव्वा कोटी रुपये मानधन मिळत असताना त्यापेक्षा कमी मानधनात पुणे विद्यापीठात मी कसा काम करेन?. परंतु, जर याकामी त्यांना माझा वेडेपणा वाटत असेल तर असा वेडेपणा मी वारंवार करायला तयार होईन.

ज्यावेळी मी पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची सूत्रे स्वीकारली त्याचवेळी मी सांगितले होते की, मी येथे फक्त तीन वर्षेच काम करेन आणि त्याप्रमाणेच झाले. पुणे विद्यापीठात माझ्या हातून समाजाभिमुख काम झाले. शिक्षण व समाज यामध्ये जी दरी होती ती दरी दूर करण्याचे मुख्य काम मी केले आहे. स्पेशल पीएच. डी. सुरु करण्याचे समाधान मला लाभले. वेळेला महत्व देऊन काम सुरु केले तर निश्चितपणे यश मिळते. त्यासाठी मनात तीव्र इच्छा असायला हवी. कुलगुरु म्हणून काम करताना ज्या ज्या योजना मी कार्यान्वित केल्या त्यात माझ्याबरोबर पुणे विद्यापीठातील प्राध्यापक वर्ग व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. त्यामुळेच या योजना यशस्वी झाल्या.

प्रभारी कुलगुरु डॉ. अरुण अडसुळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या मनातील न्यूनगंड काढून 'समर्थ भारत अभियानातून' नव्या पिढीला दिशा देण्याचे काम डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले आहे. या अभियानाला देशातील इतर विद्यापीठांची मागणी आहे. डॉ. जाधव यांनी सुरु केलेल्या कार्यास आम्ही काही कमी पडू देणार नाही.

डॉ. नरेंद्र जाधव यांना स्मृतीचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. जाधव यांच्या पत्नी आयुष्मती जाधव यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. संपूर्ण हॉल खचाखच भरला होता. पुणे जिल्ह्यातील प्राचार्य, प्राध्यापक तसेच विविध संस्थांचे संस्थापक, विद्यार्थी संघटना मोठ्या प्रमाणात या समारंभाला उपस्थित होत्या.

प्रभात
पुणे ■ रविवार, दि. १४ जून २००९



३ विविध संघटनांतर्फे नरेंद्र जाधव यांचा सत्कार

# कुलगुरू डॉ. जाधव यांनी प्रत्येकाच्या मनात घर केले

## विविध वक्त्यांची भावना

पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) - कोणतीही नवीन योजना राबविताना त्याबाबत ठेवलेली दूरदृष्टी...., प्रत्येक काम करताना घेतलेली धडाडी..., कामाची ठेवलेली गती... आणि त्यातून होत असलेली प्रगती याबरोबरच विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याच्या उन्नतीसाठी राबविलेल्या नवीन योजना, प्राध्यापक, शिक्षकवर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन विद्यापीठाच्या विकासासाठी दिलेले योगदान, अशा विविध गुणांमुळे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी प्रत्येक व्यक्तीच्या मनात घर केले असल्याची भावना विविध वक्त्यांनी आज व्यक्त केली.

देशाच्या नियोजन आयोगाच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल गेल्या तीन वर्षांपासून पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून यशस्वीपणे कारभार करणाऱ्या डॉ. नरेंद्र जाधव यांचा कौटुंबिक सत्कार आज विद्यापीठाच्या वतीने तसेच शहरातील विविध संघटनांच्या वतीने करण्यात आला. त्या वेळी विविध वक्त्यांनी डॉ. जाधव यांच्याबद्दलच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष रावसाहेब शिंदे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. वसुंधरा जाधव, प्र-कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ, कुलसचिव माणिकराव जाधव, बीसीयूडीचे संचालक डॉ. पंडित विद्यासागर, संजय गवई, एम. एच. रास्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्याकडे असलेल्या दूरदृष्टी आणि आत्मविश्वास याच्या जोरावर गेल्या तीन वर्षांमध्ये प्रगतीपासून वंचित असलेल्या पुणे विद्यापीठाला नवसंजीवनी देण्याचे काम डॉ. जाधव यांनी केले आहे. कुलगुरुपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर तळागाळातील विद्यार्थी त्यांनी शोधला आणि त्याला पुढे आणण्याचे काम त्यांनी केले. समर्थ भारत अभियान, कमवा व शिका योजनेचे सबलीकरण, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, गरीब विद्यार्थिनींसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना याबरोबरच प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकून घेऊन डॉ. जाधव यांनी एकत्रित बसून त्यावर नेहमी चर्चा करून योग्य असा निर्णय घेतल्यानेच ते विद्यार्थी, प्राध्यापक, तसेच शिक्षक आणि विद्यापीठाच्या प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या मनात आपला ठसा उमटवून गेले आहे. त्यांनी विद्यापीठाला दिलेल्या योगदानाला कुणीही विसरणार नाही. पुणे विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी डॉ. जाधव यांनी कधीही कामात दिरंगाई केली नाही. उलट दररोज अठरा ते वीस तास काम ते करीत होते. सुट्टीच्या दिवशीही ते त्यांच्या कार्यालयात येऊन बसत होते.

### 'विद्यापीठाने दिलेले प्रेम विसरणार नाही'

''नियोजन आयोगाच्या सदस्यपदी गेलो असलो तरी गेल्या तीन वर्षांमध्ये विद्यापीठाने दिलेले प्रेम कदापि विसरणार नाही. कुलगुरू म्हणून केलेले काम 'मर्मबंधातील' ठेव आहे. गेल्या तीन वर्षांत जमा केलेले हे संचित घेऊन पुढील वाटचाल करणार आहे''. अशा शब्दात डॉ. नरेंद्र जाधव यांनी सत्काराला उत्तर देताना आपल्या भावना व्यक्त केल्या. दिल्लीत गेलो तरी महाराष्ट्राला कधीही विसरणार नाही. नियोजन आयोगाचे काम करताना राज्याला देता येईल तेवढे झुकते माप देणार. पुणे विद्यापीठालाही मोठ्या प्रमाणात अनुदान उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असणार आहे. ज्या ध्येयाने कुलगुरू म्हणून जबाबदारी स्वीकारली होती ते ध्येय बऱ्यापैकी पूर्ण झाले असल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील विविध संघटनांनी तसेच पुणे विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी केलेला हा सत्कार माझ्या एकट्याचा नसून विद्यापीठातील सर्व सहकार्यांचा आहे. विद्यापीठाचे माजी कुलगुरू बॅरिस्टर डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचा वारसा यापुढे आपण चालविणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुणे विद्यापीठाबरोबरच शहरातील विविध सामाजिक, शैक्षणिक, तसेच राजकीय संस्थांच्या वतीने कुलगुरू डॉ. जाधव यांचा सत्कार करून त्यांच्या नवीन पदाबद्दल अभिनंदन करण्यात आले.

पोलीस आयुक्त डॉ. सत्यपाल सिंह, भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह विश्वजित कदम, एमआयटीचे मंगेश कराड, डॉ. के. एच. संचेती, राजेंद्र विखे-पाटील, अंकुश काकडे, डॉ. गजानन एकबोटे, पी. ए. इनामदार, दिलीप बराटे, आमदार कमल ढोले-पाटील, यांच्यासह अनेक सामाजिक संस्थांच्या वतीने डॉ. जाधव यांचा पुष्पगुच्छ आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला.

अधिसभा सदस्य हरी सोळंकी, प्राचार्य नंदकुमार निकम, व्यवस्थापन परिषद सदस्य सुरेशचंद्र भोसले, डॉ. एकबोटे, प्रा. अतुल बागुल, विजया दळीफळे, सुदुंबरे गावचे सरपंच संजय गाडे, राजा नेर्लेकर, विकास पाटील, माणिकराव जाधव यांच्यासह अन्य मान्यवरांनी आपल्या भावना यावेळी व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या वतीने स्वामीराज भिसे, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रातील विद्यार्थिनी रक्षिता रामेश्वर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक संभाजी पठारे यांनी तर सूत्रसंचालन आणि आभार संजय चाकणे यांनी केले.

सारंग दर्शने

sarang.darshane@timesgroup.com

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थशास्त्रज्ञ, ज्यांच्या पुस्तकांची कीर्ती दिगंतात पसरून विस्तारते आहे, खुद्द पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग हे ज्यांचे चाहते आणि हितचिंतक आहेत असे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव आता लोकसभा किंवा राज्यसभेचे खासदार होणार, देशाचे थेट अर्थमंत्री होणार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर होणार की जागतिक बँकेत उच्चपदावर जाणार, याविषयी जगभर पसरलेल्या त्यांच्या लक्षावधी चाहत्यांना लागून राहिलेली उत्सुकता तूर्ततरी शमली असेल! पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी नुकतीच त्यांची केंद्रीय नियोजन आयोगावर नेमणूक केली आहे. इतके दिवस डॉ. भालचंद्र मुणगेकर हे कृषिअर्थशास्त्रज्ञ केंद्रीय नियोजन आयोगावर होते. आता डॉ. जाधव तिथे असतील. महाराष्ट्राचा केंद्रीय पातळीवर होणारा सन्मान त्यामुळे चालू राहिला आहे. आज डॉ. जाधव यांचा 'पूर्वेचे ऑक्सफर्ड' (की केंब्रिज?) असा गौरव होणाऱ्या पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अखेरचा दिवस. ते उद्या-सोमवारी दिल्लीत आपल्या कारकिर्दीतील नव्या अलौकिक आणि विलक्षण पर्वाचा प्रारंभ करतील! त्यांना केंद्रीय राज्यमंत्र्याचा दर्जा असेल.

पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपद सांभाळताना त्याचे साडेसहा लाख विद्यार्थी असल्याने परंपरागत पद्धतीच्या जगातल्या सर्वांत मोठ्या विद्यापीठाचे नेतृत्व डॉ. जाधव करत होते. पुण्याला नामांकित कुलगुरूंची परंपरा आहे. पण डॉ. जाधव यांची सर कुणालाही येणे शक्य नाही. आपल्या चैतन्यशाली, सळसळत्या आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने त्यांनी हे विद्यापीठ कधी नव्हे इतके समाजाभिमुख केले. विद्यापीठाचे तोंड आणि चेहरा म्हणजे त्याचा कुलगुरू. त्यामुळे हा चेहरा जास्तीत जास्त ठिकाणी दिसणे आणि हे तोंड जास्तीत जास्त ठिकाणी सुवचने बोलत राहणे, यातच विद्यापीठाचे अंतिम हित दडलेले असते. हे अचूक ओळखून त्यांनी अक्षरशः शेकडो जाहीर कार्यक्रम स्वीकारले असतील! कधी कधी अनौपचारिक मेळाव्यांत त्यांच्या अभिजात विनम्रतेने ते विचारीतही, की माझे

## व्यक्तिमत्त्व

**डॉ. नरेंद्र जाधव**

**नियोजन आयोगाचे नवे सदस्य**

कार्यक्रम जास्त तर होत नाहीत ना? बहुतेक सारे 'नाही' असेच म्हणत. पण एखादा चुकार 'हो, तुम्ही जरा अतीच फिरताय' असे म्हणाला तरी कुलगुरूंनी ते कधी मनावर घेतले नाही. ते फिरत, कार्यक्रम स्वीकारत आणि समाजाचे अखंड प्रबोधन करत राहिले. त्यांचे मराठी आणि इंग्रजी भाषांमधले वक्तृत्व अतिशय रसाळ, प्रवाही, प्रत्ययकारी, स्फूर्तिदायक आणि उत्स्फूर्त. कोणत्याही विषयावर हुकमी बोलण्याची त्यांची ताकद भुरळ पाडणारी. त्यांचे कार्यक्रम कव्हर करणाऱ्या साऱ्याच वार्ताहरांना एक गोष्ट पाठ झाली. ती राजहंसाची. हान्स अँडरसन या प्रख्यात डॅनिश लेखकाची. राजहंस असताना लहानपणी स्वतःला बदक समजणाऱ्या पक्ष्याची. प्रत्येकाने स्वतःच्या आत दडलेला राजहंस ओळखायला पाहिजे. मी ओळखला, असे डॉ. जाधव आवर्जून बहुतेक कार्यक्रमांमध्ये सांगत. खरेतर, जाधवांनी आपल्यातला राजहंस कसा ओळखला, याची कहाणी 'आमचा बाप आणि आम्ही' या त्यांच्या गेली कित्येक वर्षे जगभर सतत गाजत असलेल्या आत्मकथेतून सर्वांना समजली आहेच. या मूळ कथेचे लेखक सारी जाधव भावंडे होती. या आत्मकथेचे भारतीय आणि जगातल्या वीसेक भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. ते अनुवाद नरेंद्र जाधव यांच्याच नावाने ओळखले जातात. मूळ पुस्तक इंग्रजीत नेताना जाधवांना ज्येष्ठ अनुवादक आशा दामले यांनी मोलाचे साह्य केले. तिथून ते पुढे फ्रेंच तसेच इतर भाषांमध्ये गेले. या या साऱ्या अनुवादांच्या अनुभवांची सांगोपांग कहाणीही जाधव यांनी कधीतरी सांगायला हवी. मराठी लेखकाने जगाच्या बाजारात उत्तुंग यश कसे मिळवावे, यासाठीची ती गुरुकिल्ली ठरेल!



डॉ. जाधव यांची रिझर्व्ह बँकेतली ३१ वर्षांची देदीप्यमान कारकीर्द गेल्यावर्षी संपली. ती त्यांनी ऑक्टोबर, २००८ मध्ये 'प्रिन्सिपल अॅडव्हायजर अँड चीफ इकॉनॉमिस्ट' या पदावरून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यामुळे. तोवर ते 'लीन'वर होते. हे त्यांचे पद 'एग्झ्युकिटिव्ह डायरेक्टर' या श्रेणीतील होते. त्यांनी आरबीआयमध्ये असताना अफगाणिस्तान सेंट्रल बँकेचे प्रमुख सल्लागार म्हणून काम केले, तसेच ते साडेचार वर्षे 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी'मध्येही होते. गेल्यावर्षी राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रश्नावर त्यांची एकसदस्य समिती नेमली होती. महाराष्ट्रातली आत्महत्यांची टक्केवारी इतर राज्यांपेक्षा कमी आहे असे म्हटल्याने तसेच या प्रश्नाचे अभ्यासक पत्रकार पी. साईनाथ यांच्यावर टीका केल्याने हा अहवाल अनेक जाणत्यांना खटकला. विदर्भात वाढत्या आत्महत्या होत असताना नरेंद्र जाधव राज्य सरकारला 'क्लीन चिट' देत आहेत, असाही ठपका ठेवण्यात आला...

काही वर्षांपूर्वी जाधव यांच्या पुस्तकांचे प्रकाशन करताना पंतप्रधानांनी 'त्यांचे जीवन म्हणजे देशातल्या लक्षावधी वंचित व दुर्बळांसमोरचा आदर्श आहे' असे म्हटले होते. पंतप्रधानांचे हे सुभाषित जाधव यांच्या वेबसाईटवर शिरोभागी झळकत आहे. याच कार्यक्रमात काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी आपण जाधव यांना सतत काँग्रेसमध्ये येण्याचा आग्रह करतो आहोत. पण ते ऐकत नाहीत, अशी गोड तक्रार करत एक ना एक दिवस जाधव देशाचे अर्थमंत्री होतील, असे उज्वल भविष्य वर्तवले. एका मुलाखतीत जाधव यांनी आपल्याकडे राजकारणासाठी लागतात, ते सारे गुण असल्याचे नमूद केले आहे. कुटुंबाला आर्थिक सुरक्षितता देता आली की आपण राजकारणात जाण्याचा विचार करू शकतो, असेही त्यांनी यात म्हटले आहे.

एकूण, केंद्रीय नियोजन आयोग हा या 'राजहंसा'चा मधला मुक्काम दिसतोय. तो आणखी किती व कुठे कुठे भराऱ्या मारतो, हे महाराष्ट्र अपार कौतुकाने पाहात राहीलच...

# 'मी राजहंस एक!'

महाराष्ट्र टाईम्स - 14-6-2009

पुणे, रविवार, १४ जून २००९ लोकसत्ता

# पुणे विद्यापीठाने दिल्या 'मिशन मॅन'ला शुभेच्छा !


**पुणे, १३ जून/खास प्रतिनिधी**

रिझर्व्ह बँक असो, की अफगाणिस्तानमधील जबाबदारी... पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपद स्वीकारल्यानंतरही त्यांच्या झंझावातामध्ये काही बदल झाला नाही. उलटसुलट टीका-टिप्पणीची तमा न बाळगता दोन वर्षे आणि दहा महिन्यांच्या कालावधीत एकामागून एक योजनांचा धडाका त्यांनी राखला. आता वेध लागले केंद्रीय नियोजन आयोगाचे. आणि त्या मोहिमेवर निघालेल्या आपल्या 'मिशन मॅन'ला, माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांना पुणे विद्यापीठातर्फे भरगच्च सभागृहाच्या साक्षीने आज शुभेच्छापर निरोप देण्यात आला!

मावळते कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी प्रभारी कुलगुरू डॉ. अरूण अडसूळ यांच्याकडे काल सूत्रे सुपूर्द केली. सोमवारी डॉ. जाधव दिल्लीला जाणार असून मंगळवारी केंद्रीय नियोजन आयोगाच्या सदस्यपदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत. या निमित्त डॉ. जाधव यांना शुभेच्छापर निरोप देण्यासाठी विद्यापीठातर्फे आज समारंभाचे आयोजन करण्यात आले. ॲड. रावसाहेब शिंदे या वेळी अध्यक्षस्थानी होते.

डॉ. जाधव यांच्या पत्नी वसुंधरा, प्रभारी कुलगुरू डॉ. अडसूळ, कुलसचिव डॉ. माणिक जाधव, मुख्य परीक्षा नियंत्रक मा. शा. फिरंगे, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. पंडित विद्यासागर, वित्त व लेखा अधिकारी संजय गवई आदी या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते. विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळांसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, संस्थाचालक, महाविद्यालय-विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यासह अगदी आमदारांपासून ते कामगार नेत्यापर्यंत समाजाच्या विविध घटकांमधील प्रथितयश व्यक्तींनी सुमारे चार तास चाललेल्या या समारंभात डॉ. जाधव यांचा सत्कार केला. या हृद्य सोहळ्याला उत्तर देताना डॉ. जाधव म्हणाले की, 'वर्षाकाठी सुमारे सव्वा कोटी रुपयांच्या नोकरीवर पाणी सोडून कुलगुरू म्हणून पुण्यात येण्याचा निर्णय घेतला. आप्त-परिचितांनी माझी थट्टाही केली. परंतु, ज्या पुण्याने माझ्या कित्येक पिढ्यांना गावकोसाबाहेर ठेवले होते, त्याच पुण्यातील विद्यापीठाचा कुलगुरू बनून मला काव्यगत न्याय द्यायचा होता! पुणेकरांबाबत बरेच काही ऐकले असल्याने प्रारंभी थोडी धास्ती होती. परंतु, पुणेकरांनी आपल्याला भरभरून प्रेम दिले. विद्यापीठातील पांडित्य आणि समाजामध्ये काहीसा दुरावा निर्माण झालेला आढळला. तुटलेली ही नाळ पुन्हा जोडत पुणे विद्यापीठाला समाजाभिमुख चेहरा देण्यात आपण यशस्वी ठरलो.' विद्यापीठात विविध क्षेत्रांमध्ये राबविलेल्या योजनांचा वेध डॉ. जाधव यांनी या वेळी घेतला.

'आपल्या निर्णयाबाबत कोण, काय शालजोडीतील देणार याचा विचार न करता मी कृती करीत गेलो. मराठी माणसानेच मराठी माणसावर टीका करण्याची वृत्ती सोडून द्यावी. आपणच एकमेकांचे पाय खेचू नये, या गोष्टी कुलगुरूपदावर असताना प्रकर्षाने जाणवल्या. दिल्लीमध्ये केंद्रीय स्तरावर कार्यरत राहणार असलो, तरी राष्ट्रीय हित जोपासून शक्य त्या ठिकाणी महाराष्ट्र, मराठी माणूस आणि पुणे विद्यापीठाच्या हितासाठी सर्वार्थाने प्रयत्न करीन,' अशी ग्वाही डॉ. जाधव यांनी दिली.



**निरोप कुलगुरूंना... केंद्रीय नियोजन आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती झाल्यानंतर मावळते कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांना शनिवारी पुणे विद्यापीठातर्फे शुभेच्छापर निरोप देण्यात आला. त्या वेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. जाधव.**

## कुलगुरूंची सहा पदे रिक्त होणार!

कुलगुरूपदावर काम करू इच्छिणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्यातील सहा विद्यापीठांमधील कुलगुरूपदे रिक्त होण्याची शक्यता निर्माण झाली असून जूनच्या अखेरीपर्यंत त्यासाठीच्या निवड समित्या स्थापनेची प्रक्रिया सुरू होण्याची चिन्हे आहेत. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय खोले, नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृदुला फडके, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजन वेळूकर हे निवृत्त होत आहेत. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांची केंद्रीय विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाली आहे. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव हे केंद्रीय नियोजन मंडळाच्या सदस्यपदी रुजू होत आहेत, तर नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू एस. एन. पठाण यांची जूनअखेर असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या (एआययू) सरचिटणिसपदी नियुक्ती होण्याची चर्चा आहे. या परिस्थितीत या सहाही ठिकाणच्या कुलगुरूपदाची निवडप्रक्रिया आता सुरू करावी लागणार आहे.

दि: - १९ जून २००९

सम्राट



झलक

दै. 'वृत्तरत्न सम्राट'चे संपादक बबन कांबळे यांनी डॉ. नरेंद्र जाधव व त्यांच्या पत्नी वसुंधरा जाधव यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. छायाचित्रात दिनेश जाधव, चंद्रकांत कसबे, नागसेन कांबळे व सुधाकर जाधव दिसत आहेत. (छाया. बी. टी. मोरे)

# पुण्य नगरी

○वर्ष : १० ○ अंक : ७४ ○ मुंबई, बुधवार, १७ जून २००९ ○ पाने १२, किंमत २.०० रुपये



नरेंद्र जाधव यांची भारत सरकारच्या अर्थनियोजन आयोगपदी नेमणूक झाल्यानंतर त्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चैत्यभूमीवर भव्य सत्कार करताना चर्मोद्योग कामगार सेना अध्यक्ष चंद्रकांत कांबळे, राणी जाधव, समन्वय समितीचे अध्यक्ष – चंद्रकांत कसबे, सचिव – नागसेन कांबळे, ज्येष्ठ पत्रकार बबन कांबळे आणि चर्मकार समाजाचे हजारो नागरिक उपस्थित होते आणि माजी उपायुक्त दिनेश जाधव व त्यांचा परिवार छायाचित्रात दिसत आहेत.

मुंबई दैनिक संध्या

तीन रुपये सर्वाधिक खपाचे मराठी सायं दैनिक



मुंबई दैनिक संध्या ■ गुरुवार, १८ जून २००९ मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक, रत्नागिरी आवृत्ती

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थमंत्री झाले असते तर देशाचे आर्थिक चित्र फार वेगळे दिसले असते - डॉ. नरेंद्र जाधव

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी): केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य पदाची सूत्रे स्वीकारण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव काल सकाळी पुण्याहून मुंबईला आले. त्यांनी सकाळीच वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची भेट घेतली. नंतर त्यांनी राज भवनावर जावून राज्यपाल डॉ. एस.सी. जमीर यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर डॉ. नरेंद्र जाधव आपल्या कुटुंबियांसह चैत्यभूमीवर गेले. तेथे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमी स्मारकांचे दर्शन घेतले. तेथे बुद्धवंदना, त्रिशरण, पंचशील, बुद्ध पूजापाठाचा कार्यक्रम करुन डॉ. जाधव व त्यांच्या पत्नीने (वसुंधरा) भिक्खूंना चिवरदान केले. भिक्खू संघाने त्यांना आशीर्वाद दिला. यावेळी झालेल्या छोटेखानी सत्काराला उत्तर देताना डॉ. जाधव बोलत होते. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशातीलच नव्हे तर जगातील अग्रगण्य अर्थतज्ज्ञ होते. त्या महामानवाच्या पायाजवळ बसण्याचीही आमची पात्रता नाही. त्यांची देशाचे अर्थमंत्री किंवा नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष होण्याची खूप इच्छा होती. तसे झाले असते तर आपल्य देशाचे आर्थिक चित्र फार वेगळे दिसले असते. तसे झाले नाही हे भारताचे फार मोठे दुर्दैव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हांला शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा महामंत्र दिला. ती निवडणुकीची घोषणा नव्हती. आमच्या जीवनात



आमुलाग्र बदल करण्याचा तो दृढनिर्धार होता. डॉ. बाबासाहेबांच्या आदेशाचे पालन आमच्या वडिलांनी केले व आम्हा भावंडांना शाळेत घातले. आम्ही शिकलो, शिक्षणामुळेचे मोठे झालो. त्यातूनच 'आम्ही आणि आमचा बाप' ची निर्मिती झाली. त्यात केवळ जाधव कुटुंबियांची कहाणी नाही तर समाजाची चळवळ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे परिवर्तनाचे स्त्रोत आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या स्फूर्तीमुळेच हे होऊशकले. त्यांचे उपकार, कुणालाही कधीही फेडता येणार नाहीत. शिक्षणापासून कोणीही वंचित राहता कामा नये, विशेष करुन पददलित व मागासांच्या घरापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा कशी पोहोचेल यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. त्यासाठी मी सर्वातोपरी प्रयत्न करणार आहे. दुर्बल घटकांकडे विशेष लक्ष देणार आहे. डॉ. जाधव म्हणाले की, देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करीत असताना शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. महासत्ता होण्याचे बलस्थान, तरुणाई आहे. त्यांना योग्यवेळी योग्य शिक्षण मिळाले पाहिजे. अमेरिका, इंग्लंड आदी देश विकसित झाले तेव्हा त्यांच्यातील तरुणाईचे प्रमाण वाढले होते. आता बाजी उलटली आहे. तेथे वृद्धांचे प्रमाण वाढले आहे. आणि त्याचवेळी भारतातील तरुणाईचे प्रमाण वाढले आहे. त्यांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले तर आर्थिक विकासाचा वेग वाढून देश महासत्ता होईल.

यावेळी चंद्रकांत कसबे, नागसेन कांबळे, कुसुमताई गांगुर्डे चंद्रकांत कांबळे यांची भाषणे झाली. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या पत्नी वसुंधरा जाधव, भाऊ सुधाकर जाधव, दिनेश जाधव, प्रकाश जाधव, शिरीष चिखलकर आणि सहाय्यक आयुक्त नारायण पै, माजी पोलिस महानिरिक्षक सुधाकर सुराडकर तसेच बौद्ध धर्मगुरु भन्ते दिपकर, भन्ते धम्मरत्न, भन्ते करुणानंद, भन्ते राहुल मित्र, भन्ते महानामा आदी मान्यवर उपस्थित होते.

गुरुवार
१८ जून २००९

दैनिक विश्व सम्राट

# 'डॉ. बाबासाहेब अर्थमंत्री असते, तर देशाचे चित्र बदलले असते'



मुंबई/प्रतिनिधी

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देशाच्या नियोजन आयोगाच्या उपाध्यक्षपदावर काम करण्याची तसेच अर्थमंत्री व्हायची इच्छा होती. तसे झाले असते, तर या देशाचे चित्रच बदलले असते, असे प्रतिपादन केंद्रीय नियोजन आयोगाचे नवनिर्वाचित सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

केंद्रीय नियोजन आयोगाच्या सदस्यपदाची सूत्रे स्वीकारण्यापूर्वी डॉ. नरेंद्र जाधव यांनी चैत्यभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. तत्पूर्वी सकाळीच वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची भेट घेतली. नंतर त्यांनी राजभवनावर जाऊन राज्यपाल डॉ.एस.सी. जमीर यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर डॉ. नरेंद्र जाधव आपल्या कुटुंबियासह चैत्यभूमीवर गेले. तेथे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमी स्मारकाचे दर्शन घेतले. तेथे बुद्धवंदना, त्रिसरण, पंचशील, बुद्ध पुजापाठाचा कार्यक्रम करून डॉ.जाधव व त्यांच्या पत्नीने (वसुंधरा) भिक्खूंना चिवरदान केले. भिक्खूसंघाने त्यांना आशिर्वाद दिला.

यावेळी झालेल्या छोटेखानी सत्काराला उत्तर देताना डॉ.जाधव म्हणाले,भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे देशातीलच नव्हे, तर जगातील अग्रगण्य अर्थतज्ज्ञ होते. त्या महामानवाच्या पायाजवळ बसण्याचीही आमची पात्रता नाही. त्यांची देशाचे अर्थमंत्री किंवा नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष होण्याची खूप इच्छा होती. तसे झाले असते तर आपल्या देशाची आर्थिक चित्र फार वेगळे दिसले असते. तसे झाले नाही हे भारताचे फार मोठे दुर्दैव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा, असा महामंत्र दिला. ती निवडणुकीची घोषणा नव्हती. आमच्या जीवनात आमूलाग्र बदल करण्याचा तो दृढनिर्धार होता, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी चंद्रकांत कसबे, नागसेन कांबळे, कुसुमताई गांगुर्डे, चंद्रकांत कांबळे यांची भाषणे झाली. डॉ.नरेंद्र जाधव यांच्या पत्नी वसुंधरा जाधव, सुधाकर जाधव, दिनेश जाधव, प्रकाश जाधव, शिरीष चिखलकर आणि सहाय्यक आयुक्त नारायण पै, माजी पोलीस महानिरीक्षक सुधाकर सुराडकर तसेच बौद्ध धर्मगुरू भन्ते दिपंकर, भन्ते धम्मरत्न, भन्ते करुणानंद, भन्ते राहुलमित्र, भन्ते महानामा आदी मान्यवर उपस्थित होते.

## डॉ. नरेंद्र जाधवांनी पदभार स्वीकारला

सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. १७ : ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी नियोजन आयोगाच्या सदस्यत्वाचा पदभार काल (ता. १६) स्वीकारला. डॉ. जाधव यांची पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदावरून नियोजन आयोगाचे सदस्य म्हणून नेमणूक झाली आहे.

डॉ. जाधव यांच्याकडे शिक्षण, सामाजिक न्याय, क्रीडा, कला, संस्कृती आणि युवक कल्याण या क्षेत्रांच्या नियोजनाची प्रामुख्याने जबाबदारी असणार आहे. बिहार, तमिळनाडू आणि गोवा या राज्यांची जबाबदारीही सोपविण्यात आली आहे.

शिक्षणाबरोबरच तरुणांशी निगडित क्षेत्रांमध्ये काम करायला मिळणार असून, पुणे विद्यापीठात राबविलेले चांगले प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर राबविण्याचा मानस डॉ. जाधव यांनी व्यक्त केला आहे.

18-6-2009 सकाळ

मुंबई,
गुरुवार,
१८ जून
२००९
किंमत २ रु.

वृत्त मानस

मुंबई-ठाणे आवृत्ती

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थमंत्री झाले असते तर देशाचे आर्थिक चित्र फार वेगळे दिसले असते - डॉ. नरेंद्र जाधव

मुंबई, गुरुवार : केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य पदाची सूत्रे स्वीकारण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव काल सकाळी पुण्याहून मुंबईला आले. त्यांनी सकाळीच वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची भेट घेतली. नंतर त्यांनी राज भवनावर जावून राज्यपाल डॉ. एस.सी. जमीर यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर डॉ. नरेंद्र जाधव आपल्या कुटुंबियांसह चैत्यभूमीवर गेले. तेथे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमी स्मारकांचे दर्शन घेतले. तेथे बुद्धवंदना, त्रिशरण, पंचशील, बुद्ध पूजापाठाचा कार्यक्रम करुन डॉ. जाधव व त्यांच्या पत्नीने (वसुंधरा) भिक्खूंना चिवरदान केले. भिक्खू संघाने त्यांना आशीर्वाद दिला. यावेळी झालेल्या छोटेखानी सत्काराला उत्तर देताना डॉ. जाधव बोलत होते. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशातीलच नव्हे तर जगातील अग्रगण्य अर्थतज्ज्ञ होते. त्या महामानवाच्या पायाजवळ बसण्याचीही आमची पात्रता नाही. त्यांची देशाचे अर्थमंत्री किंवा नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष होण्याची खूप इच्छा होती. तसे झाले असते तर आपल्य देशाचे आर्थिक चित्र फार वेगळे दिसले असते. तसे झाले नाही हे भारताचे फार मोठे दुर्दैव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हांला शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा महामंत्र दिला. ती निवडणुकीची घोषणा नव्हती. आमच्या जीवनात आमुलाग्र बदल करण्याचा तो दृढनिर्धार होता. डॉ. बाबासाहेबांच्या आदेशाचे पालन आमच्या वडिलांनी केले व आम्हा भावंडांना शाळेत घातले. आम्ही



शिकलो, शिक्षणामुळेचे मोठे झालो. त्यातूनच 'आम्ही आणि आमचा बाप' ची निर्मिती झाली. त्यात केवळ जाधव कुटुंबियांची कहाणी नाही तर समाजाची चळवळ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे परिवर्तनाचे स्त्रोत आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या स्फूर्तीमुळेच हे होऊशकले. त्यांचे उपकार, कुणालाही कधीही फेडता येणार नाहीत. शिक्षणापासून कोणीही वंचित राहता कामा नये, विशेष करुन पददलित व मागासांच्या घरापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा कशी पोहोचेल यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. त्यासाठी मी सर्वातोपरी प्रयत्न करणार आहे. दुर्बल घटकांकडे विशेष लक्ष देणार आहे. डॉ. जाधव म्हणाले की, देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करीत असताना शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. महासत्ता होण्याचे बलस्थान, तरुणाई आहे. त्यांना योग्यवेळी योग्य शिक्षण मिळाले पाहिजे. अमेरिका, इंग्लंड आदी देश विकसित झाले तेव्हा त्यांच्यातील तरुणाईचे प्रमाण वाढले होते. आता बाजी उलटली आहे. तेथे वृद्धांचे प्रमाण वाढले आहे. आणि त्याचवेळी भारतातील तरुणाईचे प्रमाण वाढले आहे. त्यांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले तर आर्थिक विकासाचा वेग वाढून देश महासत्ता होईल.

यावेळी चंद्रकांत कसबे, नागसेन कांबळे, कुसुमताई गांगुर्डे चंद्रकांत कांबळे यांची भाषणे झाली. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या पत्नी वसुंधरा जाधव, भाऊ सुधाकर जाधव, दिनेश जाधव, प्रकाश जाधव, शिरीष चिखलकर आणि सहाय्यक आयुक्त नारायण पै, माजी पोलिस महानिरिक्षक सुधाकर सुराडकर तसेच बौद्ध धर्मगुरु भन्ते दिपकर, भन्ते धम्मरत्न, भन्ते करुणानंद, भन्ते राहुल मित्र, भन्ते महानामा आदी मान्यवर उपस्थित होते.

www.esakal.com

सकाळ

मुंबई । १९ जून २००९ । पाने २० (८ पानी टुडेसह) + फॅमिली डॉक्टर

शुक्रवार

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बनायचे होते अर्थमंत्री

## डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रतिपादन

**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देशाचे अर्थमंत्री किंवा नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष बनण्याची इच्छा होती. त्यांची इच्छा पूर्ण झाली असती, तर आज देशाचे आर्थिक चित्र निश्चितच वेगळे दिसले असते, असे प्रतिपादन केंद्रीय नियोजन आयोगाचे नवनिर्वाचित सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

नियोजन आयोगाच्या सदस्यपदाची सूत्रे स्वीकारण्यासाठी मुंबईत आलेल्या डॉ. जाधव यांनी राज्यपाल एस. सी. जमीर आणि मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची बुधवारी भेट घेतली. त्यानंतर त्यांनी सहकुटुंब दादर येथील डॉ. आंबेडकरांच्या चैत्यभूमी स्मारकाचे दर्शन घेतले. भिक्खू संघाच्या वतीने यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशातीलच नव्हे, तर जगातील अग्रगण्य अर्थतज्ज्ञ होते. त्यांना अर्थमंत्री किंवा नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष बनण्याची इच्छा होती; मात्र त्यांची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा त्यांनी दिलेला मंत्र निवडणुकीची घोषणा नव्हती, तर आमच्या जीवनात आमूलाग्र बदल करण्याचा तो दृढनिश्चय होता. बाबासाहेबांच्या आदेशाचे पालन आमच्या वडिलांनी केले. आम्हा भावंडांना शाळेत घातले. शिक्षणामुळे आम्ही मोठे झालो. बाबासाहेब हेच आमचे प्रेरणास्रोत आहेत, असे त्यांनी सांगितले.

डॉ. नरेंद्र जाधव यांच्या पत्नी वसुंधरा जाधव, सुधाकर जाधव, दिनेश जाधव, प्रकाश जाधव, माजी पोलिस महानिरीक्षक सुधाकर सुराडकर आदी या वेळी उपस्थित होते.

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

# सामना

दि: १९-६-२००९

## डॉ. आंबेडकर अर्थमंत्री झाले असते तर आर्थिक चित्र बदलले असते

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) - डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थमंत्री झाले असते तर देशाचे आर्थिक चित्र पालटले असते, असे प्रतिपादन डॉ. नरेंद्र जाधव यांनी दादर येथील चैत्यभूमीवर केलेल्या भाषणात केले.

केंद्रीय नियोजन आयोगाच्या सदस्यपदाची सूत्रे स्वीकारण्यासाठी डॉ. जाधव यांनी आज मुंबईत मुख्यमंत्री अशोक चव्हाण व राज्यपाल डॉ. एस. सी. जमीर यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी आपल्या कुटुंबीयांसमवेत चैत्यभूमीचे दर्शन घेतले. त्यावेळी ते बोलत होते. हिंदुस्थान हा जगातील सर्वात तरुण देश आहे. देशाला जगातील महासत्ता बनवायाचे असल्यास समाजातील खालच्या स्तरापर्यंत शिक्षणाचा प्रसार होणे गरजेचे आहे. पददलित व मागासवर्गीयांना शिक्षणाचा फायदा व्हावा यासाठी सतत प्रयत्नशील राहणार असल्याचे यावेळी जाधव यांनी सांगितले. देशातील तरुणांनी शिक्षणावर लक्ष केंद्रित केल्यास आर्थिक विकासाचा वेग वाढून देश जगातील महासत्ता बनेल. डॉ. आंबेडकर यांच्यापासून प्रेरणा घेऊन आमच्या वडिलांनी आम्हाला शिक्षण दिले, त्यामुळेच माझ्या हातून 'आम्ही आणि आमचा बाप' या पुस्तकाची निर्मिती झाल्याचेही त्यांनी पुढे सांगितले. याप्रसंगी चंद्रकांत कांबळे, नागसेन कांबळे, चंद्रकांत कसबे आदी मान्यवरांची भाषणे झाली. या कार्यक्रमाला सहायक आयुक्त नारायण पै, माजी पोलीस महानिरीक्षक सुधाकर मुराडकर, सुधाकर जाधव, प्रकाश जाधव, शिरीष चिखलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

..., पुणे.

बहुजनरत्न
# लोकनायक
वर्षे : ४ • अंक : २३८ • शनिवार, दि. २० जून २००९ मूल्य - २ रुपये पाने - ८ Reg.No. MAHMAR/2006/17652,

## बाबासाहेब अर्थमंत्री झाले असते तर आर्थिक चित्र वेगळे दिसले असते. - डॉ. नरेंद्र जाधव

मुंबई (प्रतिनिधी) - केंद्रीय नियोजन आयोगाच्या सदस्यपदाची सूत्रे स्वीकारण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव पुण्याहून मुंबईला आले. त्यानंतर डॉ. नरेंद्र जाधव आपल्या कुटुंबियांसह चैत्यभूमीवर गेले, तेथे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमी स्मारकांचे दर्शन घेतले. तेथे बुद्धवंदना, त्रिशरण, पंचशील, बुद्ध पुजापाठाचा कार्यक्रम करुन-डॉ. जाधव व त्यांच्या पत्नीचे भिक्खूंना चिवरदान केले. भिक्खूसंघाने त्यांना आशिर्वाद दिला. यावेळी झालेल्या छोटेखानी सत्कारला उत्तर देताना डॉ. जाधव बोलत होते. देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करीत असताना शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे, महासत्ता होण्याचे बलस्थान 'तरुणाई' आहे. त्यांना योग्यवेळी योग्य शिक्षण मिळाले पाहिजे. अमेरिका, इंग्लंड आदि देश विकसित झाले, तेव्हा त्यांच्यातील तरुणाईचे प्रमाण वाढले होते. आता बाजी उलटली आहे. तेथे वृद्धांचे प्रमाण वाढले आहे आणि त्याचवेळी भारतातील तरुणाईचे प्रमाण वाढले आहे. त्यांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले तर आर्थिक विकासाचा वेग वाढून देश महासत्ता होईल. असेही ते म्हणाले.

यावेळी चंद्रकांत कसबे, नागसेन कांबळे, कुसुमताई गांगुर्डे, चंद्रकांत कांबळे यांची भाषणे झाली. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या पत्नी वसुंधरा जाधव, भाऊ सुधाकर जाधव, दिनेश जाधव, प्रकाश जाधव, शिरिष चिखलकर आणि सहाय्यक आयुक्त नारायण पै, माजी पोलिस महानिरिक्षक - सुधाकर सुराडकर तसेच बौद्ध धर्मगुरु भन्ते दिपकर, भन्ते धम्मरत्न, भन्ते करुणानंद, भन्ते राहुल मित्र, भन्ते महानामा आदि मान्यवर उपस्थित होते.

वाचकांच्या पहिल्या पसंतीचे
मराठी राष्ट्रीय दैनिक

लोकमत

मुंबई ▮ रविवार, दि. २१ जून २००९ ▮ पृष्ठे : १२+४=१६ किंमत – रु. ३.००

# डॉ. आंबेडकर अर्थमंत्री झाले असते तर आर्थिक चित्र वेगळे असते – डॉ. नरेंद्र जाधव

**मुंबई, दि. २० (प्रतिनिधी)** – भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर देशातील नव्हे तर जगातील अग्रगण्य अर्थतज्ज्ञ होते. त्यांची देशाचे अर्थमंत्री किंवा नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष होण्याची खूप इच्छा होती. समजा तसे झाले असते तर आज देशाचे आर्थिक चित्र वेगळे असते. मात्र असे झाले नाही हे देशाचे मोठे दुर्दैव आहे, अशी खंत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केली.

केंद्रीय नियोजन आयोगाच्या सदस्यपदाची सूत्रे स्वीकारण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव मुंबईत आले असताना चैत्यभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, डॉ. आंबेडकरांनी आम्हाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा महामंत्र दिला, ती निवडणुकीची घोषणा नव्हती. आमच्या जीवनात अमूलाग्र बदल करण्याचा तो दृढनिर्धार होता. मी लिहिलेले 'आमचा बाप आणि आम्ही' हे पुस्तक म्हणजे जाधव कुटुंबीयांची कहाणी नसून, समाजाची चळवळ आहे.

डॉ. आंबेडकर हे परिवर्तनाचे स्रोत असून, पद-दलितांच्या घरापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा कशी पोहोचेल याकरिता मी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. याव्यतिरिक्त देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. महासत्ता होण्याचे बलस्थान 'तरुणाई' असून, त्यांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित केले तर आर्थिक विकासाचा वेग वाढून देश महासत्ता होईल, असेही ते म्हणाले.

यावेळी वसुंधरा जाधव, सहाय्यक आयुक्त नारायण पै, माजी पोलीस महानिरीक्षक सुधाकर सुराडकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.